MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ अंक –३१७ | शुक्रवार दि.०९ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

- बीडचा बिहार कसा झाला नवीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्यासमोर दैनिक महाराष्ट्र आरंभ मांडणार सविस्तर गुन्हेगारीचा माफियांचा लेखाजोखा?
- सामूहिक लैंगिक अत्याचार, ज्ञानराधा जिजाऊ, साईराम, राजस्थानी, मल्टीस्टेटसह आर्थिक गुन्हे शाखेतील
- लाचखोर हरिभाऊ खाडे प्रकरणी डीवायएसपी विश्वंभर गोल्डेनी हात धुवून घेतले?
- संबंधित वेगवेगळ्या गुन्ह्याची माहिती मीडियाला देण्यास डीवायएसपी विश्वंभर गोल्डे कडून टाळाटाळ?
- अनेक पत्रकारांचे नंबर ब्लैक लिस्ट मध्ये टाकून फोन न घेण्याची ऍलर्जी आहे का विश्वंभर गोल्डेनी सांगावे?
- मनोरुग्ण भोळसर अल्पवयीन मुलीच्या जबाब आणखीन पाच नाव घेतल्याने त्या लोकांची चौकशी डिवाय एस पी विश्वंभर गोल्डे करणार का?

# गृहमंत्री देवेंद्र फडवणीस आयजी मिश्राची भेट घेऊन डीवायएसपी विश्वंभर गोल्डेची दैनिक महाराष्ट्र आरंभ लेखी तक्रार करणार?

## मल्टीस्टेट वाल्यांचा बलात्कार ॲट्रॉसिटी सह दोन नंबर वाल्यांची माहिती देण्यास डी वाय एस पी गोल्डे कडून टाळाटाळ?

## ॲट्रॉसिटी चे अनेक गुन्हे मध्ये लोकांना न्याय मिळत नाही डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांच्याकडे कित्येक गुन्हे तपास कामी पडून?

## बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांना गुन्ह्याची माहिती झाकून ठेवण्यासाठी गोल्ड मेडल नवीन एसपी अविनाश बारगळ यांच्याकडून मिळणार कडून का?

## ज्ञानराधा साईराम जिजाऊ राजस्थानी मल्टीस्टेट वाल्यांची माहिती डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे वेळोवेळी का देत नाहीत?

## मनोरुग्न भोळसर पीडित मुलीला आंबेजोगाई येथील वस्तीग्रहामध्ये सोडण्यासाठी दीपक थोरात करण लोंढे नितीन सोनवणेची परवानगी ने त्या ठिकाणी सोडल्याची चर्चा? डीवायएसपी विश्वंभर गोल्डे उत्तर देतील का?

- बीडचे डी वाय एस पी विश्वंबर गोल्ड्डे बीड पोलीस ठाण्याचे पि आय अशोक मुदिराज रमेश उबाळे हनुमंत उगलेला वाचविण्यात साठी प्रयत्न करत आहेत?
- उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकरांच्या बायकोचे पासबुक लाचखोर हरिभाऊ खाडेच्या घरी सापडले या प्रकरणाची काय चौकशी केली डी वाय एस पी गोल्डन उत्तर द्यावे?
- लाचखोर पीआय हरिभाऊ खाडे यांच्या विषयाचा तपासामधील सत्य परिस्थिती हरिभाऊ खाडेच्या बाबतीतील माहिती डीवायएसपी विश्वंभर गोल्डे नी मीडियासमोर सांगावी?
- पीआय हरिभाऊ खाडे च्या जामीनासाठी डीवायएसपी विश्वंभर गोल्डेनी हरिभाऊ खाडे च्या कार्यकाळामधील एकूण मल्टीस्टेट वाल्याची सर्व माहिती जनतेसमोर मांडणे गरजेचे? आणि
- हरिभाऊ खाडे यांना पोलिसांनीच जामीन मिळवून दिल्याची ही चर्चा?
- तत्कालीन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकरांना वाचविण्यासाठी हरिभाऊ खाडे च्या माध्यमातून विश्वंभर गोल्डे चा आटापिटा नामदेव टिळकरांच्या बायकोची व टिळकारांची सखोल चौकशीची गरज आर्थिक गुन्हे शाखेला वाटली नाही का विश्वंभर गोल्डेनी उत्तर द्यावं?






बीड /प्रतिनिधी

डीवायएसपी विश्वंभर गोल्डेचा झाकालोपा उघड झाला आहे दोन नंबर वाल्याला पोसणारे विश्वंभर गोल्डे व त्यांच्या जवळचे पोलीस कर्मचारी यांना जनाची नाही तर मनाची ही नाही का अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे? कारण दोन नबरवाल्याचे खाऊन ढेकर न देणारे डी वाय एस पी गोल्डे त्याचे पोलीस कर्मचारी व स्वतः त्यांनी पिडीत मनोरूग्न भोळसर अल्पवयीन मुलीच्या प्रकरणात पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदीराज, रमेश उबाळे, हनुमंत उगले, याना पाठीशी घातले आहे. पाठीशी न घालता त्यावर कारवाई करणार आहेत का हेही बीडच्या जनतेला कळून द्या विश्वाभर गोल्डे यांनी संबंधित पोलीस ठाण्यातील कथित सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना वाचविणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना आश्रय दिल्याने त्यांच्यावरती कारवाई न करण्याची साठी काय तडजोडी झाल्या आहेत ह्या पोलीस अधीक्षक कार्यालय व पेठ बीड ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा रंगू लागल्या असल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे? बीड शहर, शिवाजीनगर, पेठ बीड, बीड ग्रामीण, नेकनुर, पिंपळनेर, या पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्यावाल्यांना पाठबळ देणारे संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी यांच्याशी डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे यांनी कानमंत्र दिला का काय जगा आणि जगू द्या अशी चर्चा सध्या तोंडावर बोट हाताची घडी अशी परिस्थिती पाहायला मिळत आहेत डी वाय एस पी विश्वंभर गोरडे यांच्या बीड तालुक्यामध्ये एकूण किती पोलीस स्टेशन आहेत या पोलीस स्टेशनचे किती कर्मचारी डीवायएसपी विश्वंभर बोलले व त्यांच्या टीम मधील पोलीस कर्मचारी यांच्याशी तळजळीसाठी संघटन करत आहेत मात्र यावेळी अवैध गुटका मटका पत्त्याचे क्लब अवैध अवैध दारू सिंधी ताडी सह चक्री गुडगुडी चोरी च्या घटना सह माफीयांना पोशण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे अनेक कर्मचारी सक्रिय असतांना हप्तेखोरीने या ठिकाणी अक्षरशः नंगानाच केला असून सर्वसामान्य माणूस जर बीड तालुक्यातील डीवायएसपी असलेले बीडचे विश्वंभर गोल्डेनी याबद्दल काहीच माहीत नसल्यासारखी कारणे व डी वाय एस पी विश्वंभर गोल्ड यांच्या हद्दीतील पोलीस स्टेशन मधील अधिकारी कर्मचाऱ्यांनी अक्षरशः नंगानात चालू करून माफीयांची पाठराखण करत दोन नंबर वाल्यांना अच्छे दिन आणण्याची चर्चा बीड तालुक्यामध्ये चर्चा जोरदार चालू असल्याने ऐकायला मिळत आहे? सामूहिक बलात्कार प्रकरणांमध्ये वेगळे वळण मिळाले असताना सुद्धा या प्रकरणांमध्ये पोलिसांनी आरोपींची आर्थिक तडजोड करत राजरोजपणे पेठ बीड पोलीस ठाण्यातून आरोपींना सोडून देण्यात आले होते त्या दिवशी १८ जुलै रोजी रात्री संबंधित घटना घडल्यानंतर ११२ वरती कॉल जाऊन सुद्धा पेठ बीड पोलीस ठाण्यामध्ये संबंधित मुलीला आणून बसवले व ठाण्याचे पीएसओ असलेले पोलीस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून पोलीस स्टेशन पेठ बीड ठाण्याच्या डायरीला स्टेशन डायरीला नोंद न घेतल्यामुळे आरोपींना सोडून देण्याची प्रक्रिया झाली यामध्ये संबंधित प्रकरणाला दैनिक महाराष्ट्र आरंभ ने संबंधित प्रकरणाच्या बातम्या प्रकाशित केल्यानंतर पेठ बीड पोलीस ठाण्यात बीड जिल्हा पोलीस प्रशासनाची धांदल उडाली यानंतर संबंधित आरोपीच्या विरोधात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी हनुमंत उगले यांना फिर्यादी करत त्यांनी यावरती पडदा टाकण्याचा प्रयत्न केला परंतु पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मु फौजदार दिराज रमेश उबाळे हनुमंत उगले यांना तात्काळ निलंबित करावे या मागणीसाठी अनेकदांनी प्रयत्न केले परंतु डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी स्वतःकडं घेतली आणि या प्रकरण आम्ही कारवाई करत आहोत असं दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु संबंधित करण्यामध्ये कारवाई न करताच त्यांनी या ठिकाणी मात्र डी वाय एस पी पदाचा उपयोग करत आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांना वाचून आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना एक प्रकारे प्रोत्साहन देण्याची दिसून आले आहे. परंतु यावेळी आता बीडचे डीएसपी हे वादाच्या भवऱ्यामध्ये सापडले आहेत. बीड जिल्ह्याला नवीन पोलीस अधीक्षक मिळाले असून अविनाश बारगळ यांनी या प्रकरणाकडे किती गांभीर्याने पाहत आहेत हे बघणे गरजेचे आहे. महाराष्ट्र दैनिक महाराष्ट्र तरी दैनिक महाराष्ट्र आरंभ ने पीडित अल्पवयीन मुलीला न्याय मिळत नाही तोपर्यंत दैनिक महाराष्ट्र आरंभ प्रयत्न करणार आहे तरी डी वाय एस पी विश्वंभर गोंडे यांच्या प्रकरणात आता राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या प्रकरणाचा करण्यासाठी छत्रपती संभाजी नगर विभागीय पोलीस महानिरीक्षक आय जी, वीरेंद्र मिश्रा यांचीही भेट घेऊन डीवायएसपी विश्वंभर गोल्डे पि आय अशोक मुदिराज फौजदार उबाळे हनुमंत उगले यांच्या विषयी लेखी तक्रार दैनिक महाराष्ट्र आरंभ करणार आहे.?

बीडचे डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे हे बीडला रुजू झाल्यापासून विविध वादग्रस्त प्रकरणांमध्ये ते अडकले आहेत याचा प्रामुख्याने भाग पहिला तर बीडचे तत्कालीन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांच्या पत्नी च्या नावाने असलेले बँक पासबुक हे भ्रष्ट पोलीस अधिकारी व आर्थिक गुन्हे शाखेचा हरिभाऊ खाडे हा अँटी करप्शन च्या जाळ्यामध्ये अडकलेला मोठा मासा म्हणून हरिभाऊ खाडे कडे पाहिले जात आहे. लाचखोर पि आय हरिभाऊ खाडे च्या चौकशी संदर्भामध्ये लाघलूचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोल्डेनाही नोटीस देऊन संबंधित प्रकरणात चौकशीसाठी बोलवले होते व यावेळी मात्र आता डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे यांनी चाणाक्ष शक्कल लढवत पत्रकारांचे नंबर ब्लैक लिस्ट मध्ये टाकून बलात्कार खून दरोडा ट्रॉसिटी दोन नंबर वाल्या सह बीड मधील ज्ञानराधा साईराम जिजाऊ राजस्थानी मल्टीस्टेट सह अन्य विविध बँकेच्या संदर्भातील आर्थिक गुन्हे शाखेची संबंधित असलेल्या सर्व गुन्हा ची माहिती डीवायएसपी विश्वंभर गोल्डे हे लपवून ठेवण्यात माहिर आहेत यामध्ये डीवायएसपी यांनी मात्र आता पत्रकारांना माहिती देण्यापासून टाळा करणे पत्रकारांचे नंबर ब्लैक लिस्ट मध्ये टाकणे तसेच पत्रकाराचे नंबर फोन न उचलताच माहिती लपवून ठेवणे आपल्या जवळच्या बगलबच्चन कडून संबंधित प्रकरणाची काही तडजोड होते का अशी चर्चा एसपी ऑफिस परिसरामध्ये जोर धरू लागले आहे एसपी ऑफिस परिसरातील काही पोलीस कर्मचारी यांची विविध प्रकरणाच्या चौकशीमध्ये डी वाय एस पी हे आपल्या जवळच्या लोकांना तळघोळीसाठी पाठवत असल्याची चर्चा पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये रोष निर्माण करत आहे यामध्ये मात्र आता पोलीस अधीक्षक म्हणून बीडला नव्याने येत असलेले अविनाश बारगळ साहेब यांना मात्र आता डीवायएसपी विश्वंभर गोल्डेच्या अनेक कारनाम्याची चौकशीसाठी पथक नेमण्याची वेळ येऊ नये अशी चर्चा बीड जिल्हा पोलीस दलात चालू आहे.? बीड शहर पोलीस स्टेशन हद्दीतील बलात्कार प्रकरणांमध्ये अल्पवयीन मनोरुग्न भोळसर मुलीवरती नराधमांनी केलेला सामूहिक लैंगिक अत्याचार हा बीड जिल्ह्यामध्ये चांगलाच गाजला आहे यामध्ये तीन आरोपी अटक असताना संबंधित मुलीचा जवाब घेतला असताना अन्य पाच लोकांचे नाव या ठिकाणी त्या मुलीने घेतले आहेत त्या लोकांची चौकशी करणार आहेत का नाहीत याच्यासाठी डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांना दैनिक महाराष्ट्र आरंभ ने संपर्क केला असता त्यांनी संबंधित नंबर ब्लैक लिस्ट मध्ये टाकत माहिती देण्यास टाळा केली आहे. परंतु या प्रकरणांमध्ये पेठ बीड पोलिसांना वाचविण्यासाठी डीवायएसपी गोल्डे यांनी मात्र आता नवीन शक्कल लढवून वेगवेगळ्या माध्यमातून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केलेला आहे म्हणून डी एस पी विश्वंभर गोल्डे यांना बीड तालुक्यातील दरोडा ट्रॉसिटी मोठ्या गुन्ह्यात बलात्कारासारखे मोठाले गुन्हे याच्यामध्ये तपासासाठी सर्व माहिती लपवून ठेवत काय साध्य करायचे आहे हे स्पष्ट होत नाही म्हणून डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांना गोल्ड मेडल देणे गरजेचे आहे



# परळीला मनमानी आणि गुंडगिरी पासून मुक्त - ॲड. शेख शफीक भाऊ

परळी ।प्रतिनिधी

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान परळी विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.या बैठकीत पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष शेख शरीफ व शहराध्यक्ष कादर कुरेशी, परळीचे कार्याध्यक्ष फेरोज खान, ज्येष्ठ नेते अश्फाक सेठ, इस्तियाक भाई, सईद भाई, युवक शहराध्यक्ष शेख अन्वर, युवा नेते शेख मोहसीन, युवा नेते तौफीक भाई, नेहाला भाई, अतीक भाई, बीड सोशल मिडियाध्यक्ष सोहेल शिकलकर, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळी विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना




मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडवाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे. आपण पाहतच आहात की, गेल्या काही वर्षांपासून परळी विधानसभा मतदारसंघात मुंडे बहीण-भावाची मोठ्या प्रमाणात मनमानी हुकूमशाही आणि त्यांच्या चेल्यापेल्यांची गुंडगिरी सुरू आहे. यामुळे सर्वसामान्य गोरगरीब परळीकरांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. हे बहिण भाऊ स्वतःच्या मनाला येईल तेव्हा कधी कोणी विधानसभेत तर कधी कोणी विधान परिषदेत अशाप्रकारे खांदेपालट करून जनतेला मूर्खात काढत आहे. यांच्या हुकूमशाही मधून परळीकरांना बाहेर काढायचे आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत येथे झालेल्या मतदानाची आकडेवारी पाहता येथे कशा प्रकारचे राजकारण केले जाते हे सर्वांना दिसून आलेच आहे. या अवस्थेतून येथील जनतेला बाहेर काढण्यासाठी आपला एमआयएम पक्षच समर्थ आहे इतर पक्षात ती धमक नाही. जनहिताची कामे फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे आपल्याला करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ़ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

## मुकुंदराज वनपर्यटनासाठी दीड कोटींचा निधी

# आ. मुंदडाच्या माध्यमातून पर्यटन रोजगाराला मिळणार चालना

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

निसर्गाने मुक्तहस्ते वरदान दिलेल्या मुकुंदराज स्वामी समाधी परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करण्यासाठी राज्य शासनाने १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. वनसंपदेचे भांडार असलेल्या या भागाचा विकास करण्याच्या हेतूने आ. नमिता मुंदडा यांनी शासनाकडे वारंवार केलेल्या मागणीला यानिमित्ताने यश मिळाले आहे. अंबाजोगाई लगतच्या डोंगर रांगात मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराज यांची समाधी आहे. डोंगर-दऱ्या असलेल्या या परिसरात निसर्गाने मुक्तहस्ते सृष्टिसौंदर्याची उधळण केलेली आहे. अमाप वनसंपदा आणि नैसर्गिक सौंदर्य लाभलेला हा परिसर निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीकोनातून वंचित राहिला. या परिसराचा विकास व्हावा आणि पर्यटनाच्या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळावा या हेतूने केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमितामुंदडा यांनी मुकुंदराज वनपर्यटनासाठी वनविभागाकडे ६ कोटी ३८ लाख रुपयांचा प्रस्ताव दिला होता. यापैकी २ कोटी ७८ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर मंजूर पैकी १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी देखील उपलब्ध करून देण्यात आला




आहे. यामुळे मुकुंदराज स्वामी निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासाला चालना मिळणार आहे. मूळ प्रस्तावातील त्रुटी दूर करून उर्वरित निधी देखील मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले आहे. दरम्यान, मुकुंदराज वनपर्यटन हा अंबानगरीच्या विकासात मैलाचा दगड ठरणार असल्याने यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री सुधीर मुनगुंटीवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ. प्रितमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा आभार मानले आहेत.

# बांधकाम व्यवसायिकच्या रोहाउसेससाठी चालू असलेले अनधिकृत रस्त्याचे काम थांबवा - अभिजीत लोमटे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथील एका नामांकित बांधकाम व्यवसायिकाचे सर्वे न ४०९ मधील त्यांच्या खाजगी जागेत रोहाउसेस चे काम चालू आहे मात्र यासर्वे नंबर मध्ये जाण्यासाठी कोठूनही रस्ता नव्हता.त्यामुळे सर्वे न ४१०,४११ मधून अनधिकृत रस्ता करण्यात आला आहे.सदरील जमीन ही जामा मस्जिदची असून या जमिनीचा वाद न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित आहे असे असताना अनधिकृत पणे रस्ता करण्यात येत आहे. या रस्त्याचे काम थांबवावे यासाठी वफ्फ बोर्ड चे पत्रही आले



असताना याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे या संबंधि डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाईचे अध्यक्ष पत्रकार अभिजीत लोमटे यांनी माहिती मागितली असता माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आली असून या रोहाउसेस मध्ये अंबाजोगाईतील मातबर नेत्याची भागीदारी असल्याची चर्चा आहे त्यामुळे राजकीय दबावाखाली अधिकारी असल्याने माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत.सदरील रस्त्याचे काम थांबवन्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी व रस्त्याचे काम तात्काळ थांबवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, महसूलमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे मागणी मान्य न झाल्यास आमरण उपोषनाचा इशारा ही दिला आहे.

# श्रीसचितानंद केरोबा बाबाचा जन्मभुमिमधे त्रीदशक जन्मोत्सव सोहळा प्रारंभ !

शिरूरकासार ।प्रतिनिधी

तालुक्यातील झापेवाडी येथे श्रीसंत केरोबा बाबा यांचा त्रिदशक जन्मोत्सव सोहळा गुरूवारी सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री,श्रीक्षेत्र कानिफनाथ गडाचे महंत श्रीरंग स्वामी व सोमेश्वर महाराज यांचे हस्ते कलश स्थापन व टाळ, विणा, मृदंग आणि ग्रंथ पुजन करून प्रारंभ झाला .

संत केरोबा बाबा एक अवलिया साधू झापेवाडी मधे वास्तव्यात होते त्यांचे भव्य मंदिर उभारण्यात आले असून महंत सुनिताताई शिंदे महाराज यांचे अध्यक्षतेखाली हा सोहळा प्रतिवर्षी साजरा केला जातो याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असुन सुरूवात झाली आहे . पहाटे काकडा , ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन , संगित रामायण ,प्रवचन ,हरिपाठ व सायंकाळी किर्तन असे कार्यक्रम होणार आहेत .




## सात दिवस पारायण ,गाथा भजन , प्रवचन आणि किर्तन !

सप्ताहात किर्तन सेवा !

गुरूवारी प्रथम किर्तन पुष्प ज्ञानेश्वर गावडे महाराज नंतर अनुक्रमे रामनाथ धोंडगे ,किशोर महाराज जाधव ,विवेक महाराज महाजन ,महंत स्वामी विवेकानंद शास्त्री,श्रीरंग स्वामी ,प्रभाताई देशमुख व गुरूवारी महंत सुनिताताई शिंदे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे .

ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा !

सप्ताह काळात ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा मोरे महाराज नासिक व कृष्णा महाराज शिंदे ,अचलाताई वाघ रानवड व सोनवने महाराज लोणावळा ,परशुराम महाराज लासलगांव ,सुरेशानंद महाराज ,सोमेश्वर शिंदे महाराज व संजय महाराज ,विजयकुमार गाडेकर पाटील (पत्रकार ) व अविनाश मोरे यांची क्रमशः प्रवचन सेवा होणार आहे .

नित्य अन्नदानाची जबाबदारी झापेवाडी ग्रामस्थांनी घेतली असुन महाप्रसाद बप्पाजी व्हरकटे हे देणार आहेत .संगित रामायण ! सात दिवस रामायणाचार्य लक्ष्मण महाराज नांदेवलीकर यांचे रसाळवाणीतुन संगित रामायण श्रवणाचा लाभ मिळणार आहे .

# गेवराई शहरातील मुस्लिम समाजाच्या असंख्य युवकांनी टाकला आण्णासाहेब राठोड यांच्यावर विश्वास

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) गटाचे गेवराई शहराध्यक्ष पदी सय्यद अख्तर यांची नियुक्ती

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गेवराई शहर अध्यक्षपदी सय्यद अख्तर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड यांनी त्यांना नियुक्ती पत्र देत गेवराई शहराची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या खांद्यावर पक्षाची शहर अध्यक्षपदाची जबाबदारी आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) हा मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांची हालचाली सुरु केल्या असून सर्व समाज तसेच मुस्लिम समाज तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन विश्वास टाकला आहे. त्या अनुषंगाने सय्यद अख्तर यांच्यावर गेवराई शहर अध्यक्षपदी पदाची जबाबदारी सोपवण्यात




आली आहे. तसेच गेवराई शहरातील साठे नगर, संघमित्रा नगर येथील मुस्लिम समाज हा एकजुटीने मोठ्या ताकदीने तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड यांच्या सोबत आहे व विश्वास टाकला आहे. गेवराई शहरातील साठे नगर भागातील सय्यद अख्तर यांनी आण्णासाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटामध्ये असंख्य युवकांसह जाहीर प्रवेश केला. आण्णासाहेब राठोड यांनी सय्यद अख्तर यांची शहर अध्यक्षपदी नियुक्ती करून त्यांच्यावर ही जबाबदारी दिली आहे. पक्षाची ताकद बळकट करण्यासाठी तसेच पक्षाला तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करावे असे आवाहन आण्णासाहेब राठोड यांनी केले आहे. तसेच सय्यद अख्तर यांनी शहराध्यक्ष पदाची जबाबदारी घेताच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आण्णासाहेब राठोड यांना गेवराई शहरातून व साठे नगर भागातून सगळ्यात जास्त लीड देईल व यासाठी रात्रंदिवस मेहनत घेऊन मोठ्या ताकदीने काम करून लीड देण्याचे काम करणार असल्याचे सय्यद अख्तर यांनी बोलताना सांगितले. यावेळी राष्ट्रवादीचे तालुका उपाध्यक्ष दत्तात्रय येवले, श्याम नाना राठोड, संतोष चव्हाण, अवि चव्हाण, मजर शेख, शेख इर्शाद, हमीद बागवान, शेख फरान सय्यद रेहान, इब्राहिम पठाण, शेख शहबाज, संतोष चव्हाण, मजेर शेख, सतिश जाधव, अवि चव्हाण, अमोल गावडे, रमेश जाधव, सचिन राठोड यांच्यासह आदी उपस्थित होते.

# आरक्षणामुळे आमचं सामाजिक न्यायाचे स्वतंत्र अबाधित आहे :पँथर नितीन सोनवणे

आरक्षणाला विरोध करणाऱ्या राज ठाकरेंनी माफी मागितली नाही. त्यामुळे आम्ही आरक्षण विरोधी चले जाओ चा नारा दिलेला आहे. बीड मध्ये मी आरक्षण विरोधी प्रवृत्तीला चले जाओचे आवाहन केले आहे. आरक्षणाला विरोध करणारे मनुवादी आहेत. त्यांना दलित गुलाम करायचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे धोरण त्यांना मान्य नाही. जब तक जातीवाद रहेगा, तब तक आरक्षण रहेगा. आरक्षण जिंदाबाद! आम्ही आरक्षणवादी, आम्हाला गर्व आहे आम्ही आरक्षणवादी आहोत. आज गरीब मराठा संविधानाच्या मार्गाने आरक्षण मागत आहेत. तर राज ठाकरे त्यांना हिनवत आहेत. आम्ही गरीब मराठा, दलित, मुस्लिम एकत्र येऊन जी राजकीय क्रांती केली तिला हे घाबरले आहेत. ते ऐक्य आम्ही तोडू देणार नाहीत.छत्रपती शिवाजी महाराजाच्या खऱ्या मावळ्यानी मराठा आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय भूमिका घेण्याचा प्रयत्न हाणून



पाडायचे हे धोरण आहे.

मराठ्यांनी गैर मावळे नाकारले आहेत, कृष्णाजी भास्कर कुलकर्णी ओळखलेत त्यामुळे यांच राजकीय अस्तित्व धोक्यात आले आहे. जे सोन्या चांदीचा चमचा तोंडात घेऊन, प्रस्तापित उच्च जातीत जन्माला आलेत त्यांना आरक्षण समानता काय कळणार...

# मा . ना .समीर काझी यांच्या उद्या होणार्या भव्य दिव्य सत्कार सोहळ्यास बीडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

## रोटरी परिवार, क्रेडाई परिवार, काझी सेवा संघ, बागवान पंच कमिटी यांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) तथा महाराष्ट्र राज्य हज कमिटीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल मा.ना.समीर गुलामनबी काझी यांच्या भव्य दिव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन उद्या दिनांक ९ ऑगस्ट २०२४ शुक्रवार रोजी सायं. ६.०० वा. रोटरी परिवार, क्रेडाई बीड , बागवान बिरादरी पंच

कमेटी, काझी सेवा संघ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आला आहे. या सत्कार समारंभास बीडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. सदरील भव्य दिव्य नागरी सत्कार सोहळा शहरातील आशिर्वाद लॉन्स, सोमेश्वर मंदीर जवळ, गोल्डन चॉईस हॉटेलच्या समोर, बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. वक्फ मंडळाच्या अध्यक्षपदी समीर काझी यांना संधी मिळाल्याने बीड जिल्ह्याच्या मानात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या सत्कार सोहळ्यात समाजातील सर्वस्तरातून नामवंत, प्रतिभावंत आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. यात आपणही उपस्थित रहावे. असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# बीड -तलवाडा पोलीस ठाणे हद्दीत चोरट्यांचा धुमाकूळ

## पांढरवाडीत रोख रक्कम दोन लाख व मौल्यवान वस्तू चोरी

गेवराई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दी चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे.तलवाडा पोलीसस्टेश नच्या हद्दीतील पांढरवाडी पोस्ट रामपुरी याठिकाणी चोरी झाल्या चे उघडकीस आले असून मेघरा ज भानुदास सुरनर यांच्या घरी ही चोरी झाली असल्याची माहिती आहे.सुरनर यांनी बँकेतून रक्कम काढून आण ल्यानंतर पाळत ठेवू न रात्रीचोरट्यां कडून डल्ला मार ण्यात आला आहे यामध्ये अंदाजे दोन लाख रुपये रक्कम व तीन तो ळे सोने चोरीला गेले असल्या ची प्राथमिक माहिती असून याप्रकर णी मेघराज सुरनार



यांच्याफिर्यादी वरून चार चोरट्याविरुद्ध तलवा डा पोलिसांत गुन्हा दाखलकरण्या त आलाअसून पुढील तपास तलवाडा पोलीस स्टेशनचेउपनिरी क्षक बाबासाहेब भवर हे करत आहेत.

# तुम्ही एकनाथ खडसेंच्या कन्या, महिलांच्या भावना काय कळणार?

## रोहिणी खडसेंच्या टीकेवर अजित पवार गटाचं जोरदार प्रत्युत्तर

**तुमच्या १५०० रुपयांमध्ये सुख मिळणार आहे का? या निर्लज्ज सरकारला याचं काही देणं-घेणं नाही. सरकारला वाटतं महिलांचे मन फक्त पैशात अडकले आहे. पण त्यांना महिला अद्याप समजल्याच नाहीत, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी लाडकी बहीण योजनेवर केली. आता रोहिणी खडसेंच्या टीकेला राष्ट्रवादी अजित पवार गटाने प्रत्युत्तर दिले आहे.**

महाराष्ट्राच्या जनतेला भ्रमित करू नका

अजित पवार गटाच्या नेत्या आभा पांडे यांनी म्हटलंय की, रोहिणी खडसे महाराष्ट्राच्या जनतेला भ्रमित करू नका. रोहिणी खडसे तुम्ही म्हणता अजितदादांनी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना काय दिलं. तर अजितदादांनी लाखो शेतकऱ्यांना मोफत विजेची संधी दिली. सौर वीजपंपाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोलाची मदत केली. एवढेच नाही तर राज्यातील दहा लाख तरुणांना रोजगाराच्या प्रशिक्षणासह स्टायपेंडची सुविधा दिली, असा प्रत्युत्तर आभा पांडे यांनी दिले आहे. रोहिणी खडसे तुम्ही कितीही प्रयत्न केले, तरी महाराष्ट्राची जनता तुमच्या या प्रयत्नांना बळी पडणार नाही, असेही पांडे म्हणाल्या आहेत.

तुम्हाला महिलांच्या भावना काय कळणार?

तर लाडकी बहीण योजनेवरून रोहिणी खडसे यांच्यावर अजित पवार गटाच्या नेत्या वैशाली नागवडे यांनी टीकास्त्र डागले आहे. १५०० रुपयांत काय होत? असे रोहिणी खडसे म्हणाल्या. त्यावर वैशाली नागवडे यांनी तुम्हाला काय कळणार महिलांच्या भावना. तुम्ही तर एकनाथ खडसे यांच्या कन्या आहात. राजकीय आशेनं तुम्ही बोलू लागल्या आहात. महिलांच्या लाभपेक्षा वैयक्तिक लाभाचा विचार करीत आहात. सरकारवर टीका केल्याशिवाय तुमची आमदारकी कशी फिक्स होणार? असा सवाल वैशाली नागवडे यांनी रोहिणी खडसेंना विचारला आहे.

# ऋतुजा मोरे कॉम्पुटर सायन्स इंजिनिअर कॉमेड परिक्षा उत्तीर्ण

## बेंगलोरच्या सिध्दगंगा इंजिनिअर कॉलजमध्ये निवड

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरातील छत्रपती नगर भागातील ऋतुजा लक्ष्मण मोरे ही विद्यार्थीनी कॉम्पुटर सायन्स इंजिनिअर परिक्षा कॉमेड २०२४ उत्तीर्ण झाल्या असुन पुढील शिक्षणासाठी तिची बेंगलोर येथील सिध्दगंगा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी टुमकुर बेंगलोर महाविद्यालयात निवड झाली आहे. ऋतुजा मोरे यांचे प्राथमिक शिक्षण सिंदफणा पब्लिक स्कुलमध्ये झाले तर महाविद्यालयीन शिक्षण उच्च माध्यमिक विद्यालय दिंद्रुड येथे झाले आहे. यानंतर ऋतुजाने जेईई प्रिपरेशन अलेन इन्स्ट्रिट्युट ऑफ कोटा राजस्थान येथे शिक्षण घेतले. याठिकाणी झालेल्या कॉम्पुटर सायन्स इंजिनिअर परिक्षा कॉमेड २०२४ उत्तीर्ण झाली असुन पदवीच्या शिक्षणासाठी ऋतुजा मोरे हिची निवड बेंगलोर येथील सिध्दगंगा इन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी टुमकुर बेंगलोर



महाविद्यालयात झाली आहे. तिच्या यशाबद्दल तिचे सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, आप्तेष्ट यांनी अभिनंदन केले आहे.

# शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर जी सातपुते यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी जल्लोषात साजरा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे तरुण उगवते नेतृत्व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख मा.परमेश्वर जी सातपुते यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख मा बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याप्रमाणे परमेश्वर जी सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करून आपले सामाजिक दायित्व पूर्ण केले यामध्ये पिंपळनेर भागातील सनराईज इंग्लिश स्कूल, डाक बंगला वस्ती शाळा, बाभळवाडी जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या चिमुकल्यांना शालेय साहित्याचे वाटप व खाऊचे वाटप करण्यात आले व जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र येथे दीपक घोडके व डॉक्टर पंकज घोडके यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने अनाथ बेघर लोकांना अन्नदानाचे पुण्यकाम केले परमेश्वर सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त इतर अनेक लोक उपयोगी उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना मराठवाडा संपर्क नेते तथा आमदार सुनीलजी प्रभु साहेब व बीड जिल्हा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी फोनद्वारे शुभेच्छा दिल्या व शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई मेटे यांनी प्रत्यक्ष



भेट घेऊन वाढदिवसाच्या विशेष शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब व सहसंपर्कप्रमुख बाळासाहेबजी अंबुरे साहेब, प्रारंभ चे संपादक जालिंदरजी धांडे, मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे, कार्यारंभ चे उपसंपादक केशवजी कदम,उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख आशिषजी मस्के, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,जिल्हासमन्वयक संजय भाई महाद्वार, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, शिवसेना जिल्हा सह सचिव युवराज मामा शिंदे,बीड शहर प्रमुख शेख निजाम यांच्या उपस्थितीत बीड जिल्हा जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे वाढदिवस साजरा करुन सर्व शिवसेनेचे पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी शुभेच्छा दिल्या

व सायंकाळी पिंपळनेर मध्ये गणेश दादा पटाईत, सुभाष शेठ चरखा व त्यांच्या सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.जगदंबा पेट्रोलियम येथे पिंपळनेर सर्कल व बाभळवाडी गावातील कारभारी वीर,सुंदर शेवाळे, राघुजी आण्णा सातपुते,अशोक नाना सातपुते, शिवाजी निर्धार,रामेश्वर सातपुते सर, लक्ष्मण सातपुते,कल्याण सर,केरबा मातकर, सतीश नाना चिंचकर, काशीनाथजी पवार, युवा नेते अश्विन लांडे सह सर्व ग्रामस्थांनी व तरूण मित्रांनी भव्य वाढदिवस साजरा करुन शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बोलताना शिवसेना पक्षामध्ये काम करीत असताना पक्षप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी आखून दिलेल्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या शिकवणीप्रमाणे यापुढेही सामाजिक कार्यात माझा नेहमी पुढाकार राहील व गोरगरीब गरजू यांच्या मदतीला नेहमीच मी शिवसेनेच्या माध्यमातून पुढे राहणार आहे व मान्यवरांनी दिलेल्या शुभेच्छा व आशीर्वादामुळे कार्य करायला बळ मिळते.

काल माझ्या वाढदिवसानिमित्त आध्यात्मिक,राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी, त्याचप्रमाणे शिवसेना परिवारातील सर्व मान्यवर व सहकारी,मिडीयाचे प्रतिनिधी,सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी, शेतकरी प्रतिनिधी, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक,मित्र,आप्तेष्ट, जेष्ठ, युवा, लहान थोर सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी मला मनपूर्वक शुभेच्छां रूपी आशीर्वाद दिले, सोशल मीडिया, फोन प्रत्यक्ष भेटून असंख्य सहकार्यांनी अगदी मनापासून शुभेच्छा दिल्या.

# नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने कवी प्रो.डॉ.संजय मोहड यांना महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड ।प्रतिनिधी**

**महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार डॉ.संजय मोहड प्रोफेसर आणि संगीत विभाग प्रमुख, स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.**

नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल दरवर्षी महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचे मानकरी प्रो.डॉ.संजय मोहड हे आहेत. त्यांनी दिलेल्या



योगदानाबद्दल त्यांचा यथोचित सत्कार नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने करण्यात येणार आहे.या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपयांचा धनादेश, स्मृति चिन्ह, सन्मानपत्र असे आहे.

प्रो.डॉ.संजय मोहड यांनी फुले-शाहू- आंबेडकर विचारांची पेरणी करत आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांची विचारधारा जनमानसात पोचवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांच्या हस्ते महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



**केज तालुक्यातील दलित चळवळीमध्ये अनेक वर्षापासून सक्रिय व एकनिष्ठ काम करणारे नेतृत्व मा. चंद्रकांत खरात (सर ) यांची माजी सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र तथा खा. चंद्रकांत हांडोरे साहेब यांनी दखल घेऊन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या मराठवाडा संघटक पदी नियुक्ती केली यावेळी नामदार खासदार आदरणीय चंद्रकांत जी हंडोरे साहेब यांच्या आदेशाने नियुक्तीपत्र देताना अमरेंद्र विद्यागर साहेब भीमराव सरवादे साहेब अमरजी माने व इतर**



# आयटीसी चिंचवन व लिंक वर्कर अंबाजोगाई मार्फत खळवट लिमगाव येथे एच आय व्ही जनजागृती व तपासणी शिबिर संपन्न

वडवणी ।प्रतिनिधी


वडवणी तालुक्यातील खळवट लिमगाव ग्रामपंचायत अंतर्गत एच आय व्ही जनजागृती व तपासणी शिबिर संपन्न झाले. येथील सरपंच श्री गणेश अंबुरे यांच्या अध्यक्षखाली हे आरोग्य शिबिर संपन्न झाले या शिबिर आयटीसी चिंचवन मार्फत समुपदेशक श्री ठोसर सर यांनी मार्गदर्शन केले व तपासण्या श्रीमती बावरे मॅडम यांनी केल्या तर लिंग वर्कर सुपरवायझर श्री पाईक सर यांनी केले. प्रेमानंद मोरे ग्राम पंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते यांनी हे शिबिर यशस्वीरित्या करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी गावकऱ्यांना विविध आजारावर समुपदेश यांनी माहिती देऊन श्रएउ देखील वाटप करण्यात आली या शिबिरात ४० जणांनी एच आय व्ही तपासणी करून घेण्यात आली. सर्व गावकऱ्यांनी आभार मानून हे शिबिर संपन्न झाले.

# कादंबरी विकत घेणाऱ्यां वाचकांचा माजलगाव परिसर च्या वतीने होणार सत्कार

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील साप्ताहिक माजलगाव परिसर चे संपादक प्रदीप कुलकर्णी यांनी लिहिलेल्या प्रेमात पडायचे होते पण या कादंबरी ची विक्री मेझॉन वर ऑनलाईन पद्धतीने चालू आहे ही कादंबरी विकत घेऊन वाचणाऱ्या वाचकांचा माजलगाव परिसर च्या वतीने आकर्षक प्रमाणपत्र देऊन संजीवन उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे तेव्हा जास्तीत जास्त वाचकांनी ही कादंबरी विकत घ्यावी आणि वाचन संस्कृती जपण्यासाठी ती टिकवण्यासाठी आपले योगदान अवश्य द्यावे असे आवाहन लेखक प्रदीप कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे

प्रेमात पडू इच्छिणाऱ्या प्रत्येका साठी प्रेमात पडल्यानंतर प्रेमाचा अर्थ समजावून सांगणारी प्रेम यशस्वी झाले नाही तरीही प्रेमच व्यक्त करणारी प्रत्येक प्रेमी जोडप्याने वाचावी अशी कादंबरी प्रियकरांनी प्रियसीला व



प्रियसीने प्रियकराला प्रेमाने भेट द्यावी अशी प्रेममय कादंबरी वाचायलाच हवी, तेव्हा त्वरित मेझॉन वर प्रतिलिपी च्या वतीने प्रकशित झालेली प्रदीप कुलकर्णी यांची ही कादंबरी आपण खरेदी करावी आणि लेखकाला प्रोत्साहन द्यावे असे आवाहन लेखकाच्या वतीने करण्यात आले आहे.



**पेठ बीड येथील येवा नेते शेख सलमान यांच्या मीत्र मंडळ तर्फे वाढदिवस साजरा करण्यात आला त्या निमित्त शेख सलमान यांच्या सत्कार करून शुभेच्छा देताना अँड. महेश धांडे.समाजसेवक मुसा खान पठान युवा नेते ऐकबाल भाऊ व मित्र मंडळ दिसत आहेत.**

# बीड जिल्हा मराठवाडा योगेश्वरी देवल कमिटीच्या नवीन सभासदांच्या विरोधात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे. युवा सेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना नेते आमदार सुनील प्रभू साहेब महाराष्ट्राच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे. मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूळकर साहेब. बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब लोकसभा प्रमुख सुनील धांडे सर, बीड जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंभोरे साहेब बीड जिल्हा प्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका प्रमुख बालासाहेब शेप प्रिन्स. शहर प्रमुख अशोक हेडे यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक ७/८/२४ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालय समोर अंबाजोगाईचा आराध्य दैवत योगेश्वरी देवी यांच्या नवीन बेकायदेशीर सभासदांच्या विरोधामध्ये गेल्या एक महिन्यापासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे जन आंदोलन चालू आहे**

या आंदोलनाचा भाग म्हणून चौथा टप्पा उपजिल्हाधिकारी कार्यालय समोर शिवसेना पक्षाच्या सध्या महाराष्ट्रामध्ये चालू असलेल्या भगव्या सप्ताह निमित्त आई योगेश्वरी देवी च्या नवीन नेमलेल्या बेकायदेशीर सभासदाच्या विरोधात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले कारण न्यायालयाने घालून दिलेले नियम व अटी नेमलेले निरीक्षक श्री कांबळे यांनी पाळलेल्या नाहीत नवीन सदस्य नेमत असताना कुठल्याही प्रकारचा



न्यायालयाचा नियम किंवा शिवसेना सप्ताह सावणिक उपो अटी न पाळल्यामुळे व या कमिटीमध्ये जे सदस्य नेमले आहेत हे सदस्य अंबाजोगाई शहरातील रहिवासी नसून ग्रामीण भागातील रहिवासी आहेत तसेच यातील सदस्य दुसऱ्या मंदिर कमिटीवर असलेले सुद्धा घेण्यात आलेले आहेत आणि यामध्ये निरीक्षक श्री कांबळे यांनी प्रचंड प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करून ह्या सदस्याची नेमणूक केली आहे तरी माननीय उपजिल्हाधिकारी साहेबांना या निवेदनाच्या माध्यमातून मी शिवसेना उद्धच बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मागणी करत आहे की ही कमिटी आठ दिवसांमध्ये बरखास्त करून अंबाजोगाईतील देवी भक्तावरील अन्याय दूर करावा कारण ज्या कमिटीवर सदस्य घ्यायला पाहिजे होते असे देवीची पालखी वाहणारे देवीची सेवा करणारे असे भोई समाज गोंधळी

समाज, आराधी बांधव या कमिटीमध्ये असायला पाहिजे होते परंतु त्यांना न घेता धन दांडगे लोकांना या कमिटमध्ये स्थान देऊन देवी भक्ता वर अन्याय केला आहे तरी या कमिटीच्या विरोधामध्ये देवी भक्तामध्ये अंबाजोगाई तालुक्यात व शहरात प्रचंड प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे त्याचाच भाग म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आज या जन आंदोलनाचा चौथा टप्पा म्हणून उपजिल्हाधिकारी कार्यालय समोर जन आंदोलन करण्यात आले या कमिटीला जर आठ दिवसांमध्ये बरखास्त केले नाही तर यापेक्षा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे प्रचंड प्रमाणात उग्र आंदोलन करून तालुक्यातील व शहरातील शिवसैनिक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही याची आपण नोंद घ्यावी व याची

सर्वश्री जबाबदारी प्रशासनावर राहील. आजच्या या आंदोलनास शिवसेना बीड जिल्हा प्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी आपले विचार मांडून या जन आंदोलनास ताकद दिली व या जन आंदोलनास लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष राजेश भैया बाहुळे. भीमशक्तीचे बीड जिल्हा अध्यक्ष भीमराव सरवदे तसेच अंबाजोगाई शहरातील व्यापाऱ्यांनी व भोई समाज आराधी समाजाने पाठिंबा दर्शविला याप्रसंगी उपस्थित उपजिल्हाप्रमुख शिवाजी दादा कुलकर्णी तालुकाप्रमुख बाळासाहेब शेप प्रिन्स. केस तालुका प्रमुख अशोक जाधव. शहर प्रमुख अशोक हेडे केस शहर प्रमुख तात्या रोडे, महिला आघाडी विधानसभा संघटिका डॉ नयनाताई शिरसाट, महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख रेखाताई घोबाळे. महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख जयश्रीताई पिंपरे, केज विधानसभा समन्वयक युवराज चव्हाण, तालुकाप्रमुख निखिल पाटोळे उपतालुकाप्रमुख बालाजी चाटे. तालुका सचिव बाबा भिसे. उपशहर प्रमुख पप्पू आपेट. माजी तालुकाप्रमुख बाळासाहेब बाघाळकर. महीला आघाडी उप तालुका प्रमुख जयश्रीताई मोरे. आशाताई जोगदंड, उपतालुकाप्रमुख सुरज बाघमारे. मनोज बाघमारे. केज विधानसभा सचिव दुल्हेखा पठाण. विधी व सेवा तालुकाप्रमुख ऍड. परमेश्वर खामकर, शाखाप्रमुख कृष्णा चाटे. गोटू चाटे. युवा सैनिक ऋषिकेश भैय्या शेप, यावेळी शिवसैनिक व महिला आघाडी प्रचंड प्रमाणात उपस्थित होते.



# तेजस्विनी ग्रुप आयोजित महिला उद्योजकाचे प्रदर्शन व विक्री एक्जीबिशनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तेजस्विनी ग्रुप मुळे शेकडो महिला बनल्या स्वकर्तृत्ववान येत्या ४ ऑगस्ट रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे खास पंचमी आणि राखी पौर्णिमेच्या निमित्ताने भरले तेजस्विनी ग्रुप तर्फे भव्य प्रदर्शन आणि विक्री, महिलांनी महिलांच्या हक्कासाठी चालवलेला मंच म्हणजेच तेजस्विनी सोनलताई पाटील आत्मनिर्भर महिलांसाठी वास्तवतेत अवतरलेले स्वप्न एक सुंदर स्वप्न - प्रा. सत्येंद्र पाटील**

बीड ।प्रतिनिधी

चूल आणि मूल यापलीकडे जाऊन महिलांनी आत्मनिर्भर होणे काळाची गरज बनली आहे. यासाठी बीड येथील तेजस्वीनी ग्रुपच्या संचालिका सौ सोनलताई पाटील होतकरू कष्टाळू उद्योजिका महिलांसाठी सातत्याने पुढाकार घेत असल्याचे दिसून येत आहे. येणारी राखीपौर्णिमा व इतर काही सणांच्या अनुषंगाने सोनलताई पाटील यांनी महिला उद्योजकांसाठी एकाच छताखाली खरेदी/विक्रीचे मोठे दालन उभारून दिले. बीड शहरातील रामकृष्ण लॉन्समध्ये भव्य खरेदी विक्री प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये हँडमेड तोरण, दागिने, मसाले, चकली चिवडा, दागिने, शोभेचे वस्तू, होम क्लीनिंग, साड्या, खाण्याचे विविध प्रकारचे स्टॉल महिलांना मांडले होते. हे स्टॉल बीडसह संभाजीनगर, लातूर, शहादा, कळंब, अहमदनगर इ. ठिकाणच्या महिलांनी देखील उभारले होते. या स्टॉलवर खरेदी करण्यासाठी बीड शहरातील तब्बल ३ ते ४ हजार महिलांनी हजेरी लावून खरेदी केल्याची नोंद झाली आहे. सोनलताई पाटील यांच्या संकल्पनेतून भरविलेल्या प्रदर्शनाचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे. दरम्यान दिवसभरात या प्रदर्शनाला माजी नगराध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ ज्योतीताई मेटे, शहर अध्यक्ष सुहास पाटील, प्रा. सत्येंद्र पाटील, नगरसेविका जयश्री विधाते यांनी भेट देऊन सोनलताई पाटील यांच्या कार्याचे अभिनंदन कौतुक केले.

सोनालताई पाटील यांच्या माध्यमातून असंख्य महिलांचा तेजस्विनी ग्रुप सुंदररित्या मार्गक्रमन करत आहे. यामधून महिलांना विक्री करण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी एकाच छताखाली मोठे दालन उपलब्ध झाले आहे. तेजस्विनी ग्रुपच्या माध्यमातून शीतल होंडारे यांनी १ लाखाची चकलीची मशीन स्वकर्तुत्वावर घेतली अलका तापडिया यांच्या पूर्ण कुटुंबाला रोजगार मिळाला आहे अशी अनेक उदाहरणं तेजस्विनी ग्रुपमध्ये पाहायला मिळत आहेत.

## अंबाजोगाईत औद्योगिक वसाहत निर्मितीच्या मार्गावर

# प्रकल्प जमिनीच्या समतल सर्वेक्षण आणि सिमांकनासाठी निघाली निविदा

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**अंबाजोगाईकरांसाठी बहुप्रतीक्षित आणि शहर विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या शासकीय औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) निर्मितीच्या दृष्टीने आ. नमिता मुंदडा यांच्या आग्रही पाठपुराव्यानंतर शासन पातळीवर वेगाने हालचाली सुरु आहेत. लवकरच अंबाजोगाई 'एमआय डीसी'साठी काळवटी तांडा परिसरात समतल सर्वेक्षण आणि सिमांकन करण्यात येणार असून या कामाची निविदा देखील प्रकाशित झाली आहे.**

अंबाजोगाई शहराचा विकास झपाट्याने होत असल्याने व या ठिकाणी बहुतांश जिल्हास्तरीय सर्व कार्यालय कार्यरत आहेत. या ठिकाणी सहकारी साखर कारखाना, सुतगिरण्या, कृषी उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उद्योग, सहकारी बँका, पतसंस्था, आरोग्य विषयक सुविधा, कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे शहरापासून लातूर येथील विमानतळ जवळ असून परळी, घाटनांदुर, लातूर येथील रेल्वे स्टेशनही जवळच आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकदारांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे शहर सोयीचे आहे. शहरालगत मोठ्या प्रमाणावर गायरान, मोकळ्या जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी एमआयडीसी प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे या भागातील सुशिक्षीत, बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळवून उद्योजकांना मोठ्या प्रमाणात चालना



मिळेल व अंबाजोगाई येथे तातडीने एमआयडीसी व्हावी यासाठी आ.नमिता मुंदडा पुढाकार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रधान सचिव उद्योग विभाग यांच्याकडे एमआयडीसी अंतर्गत अंबाजोगाई येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मंजूरी द्यावी अशी विनंती केली होती. तसेच, या बाबत आ. मुंदडा यांनी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव, भूसंपादन विभागाचे महाव्यवस्थापक आणि व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावाही केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि काळवटी तांडा परिसरातील जागा 'एमआयडीसी'साठी निश्चित करण्यात आली. हा भाग डोंगराळ असल्याने याचे समतल सर्वेक्षण करून सिमांकन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही प्रक्रिया अंबाजोगाई 'एमआयडीसी' निर्मितीतील महत्वाचा टप्पा असणार आहे. यानिमित्ताने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई शहर औद्योगिक शहर बणण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली आहे. एमआयडीसी मुळे या भागातील बेरोजगारांना रोजगार मिळेल व उद्योजकांना चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्ती करून आ. नमिता मुंदडा यांनी या बाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ. प्रितमताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांनीही केला होता प्रयत्न

अंबाजोगाईत एमआयडीसी व्हावी म्हणून दिवंगत मंत्री स्व. डॉ. विमलताई मुंदडा यांनी सन २००४ मध्ये वरवटी येथे पंचतारांकित एमआयडीसी मंजूर केली होती. त्यासाठी गायरान व शेतकर्यांची जमीन संपादन करणे आवश्यक होते. परंतु, शेतकर्यांनीह विरोध केल्याने सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाली नाही. त्यांचे अपूर्ण स्वप्न आत त्यांच्या स्नुषा आ.. नमिता यांच्या माध्यमातून पूर्ण होण्याची चिन्हे आहेत.



# विकासापासून कोसो दूर असणाऱ्या मुस्लिम बहुल भागाच्या विकासासाठी कटिबद्ध - डॉ. ज्योती मेटे

## शाहींनशावली, दाऊतपुरा भागात रस्ता कामांचे भूमिपूजन

बीड ।प्रतिनिधी

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी विकास कामांचा सपाटा लावला असून बीड शहरातील शाहींनशावली, दाऊतपुरा या मुस्लिम बहुल भागात रस्ता कामांचे भूमिपूजन केले याप्रसंगी या भागातील नागरिकांसह शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, अनिल घुमरे, सुहास पाटील, मनोज जाधव, अमजद पठाण, शेख आझर, पेंटर अख्तर, लालाभाई आदी.उपस्थित होते.

लोकनेते विनायकराव मेटे यांनी कायम मुस्लिम समाजाला न्याय द्यायचा प्रयत्न केला सुरुवातीच्या काळात मुस्लिम समाजाचे सामूहिक इस्तेमाई शादिया करून त्यांनी अनेकांचे संसार उभे केले नंतरच्या काळात मराठा आरक्षणासोबतच मुस्लिम आरक्षणासाठी देखील लढा दिला आणि मुस्लिम आरक्षण प्रश्न थेट विधानसभेत मांडला हे करत असताना बीड येथील मुस्लिम समाजातील मुलींसाठी वस्तीग्रहाचे प्रश्न, तकिया मस्जिद येतील रस्ता विकास कामे त्यांनी केली. त्याचबरोबर बीड शहरातील अनेक मस्जिद समोर बोरवेल देऊन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली २०२१ साली अनेक मुस्लिम बहुल भागात रस्ते मंजूर करून त्यांचे काम पूर्ण केले. आसे विविध काम करत त्यांनी नेहेमी मुस्लिम समजला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्याचा पाऊलावर पाऊल ठेवत डॉ. ज्योती मेटे यांनी आपण स्वर्गीय मेटे साहेबांचे मुस्लिम बहुल भागाच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काम करत आहोत आणि मुस्लिम बहुल भागाच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध राहू असे आश्वासन त्यांनी यावेळी उपस्थितांना देले.

# पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही विरोधात कानडीघाट शेतकरी आक्रमक

## नुकसानभरपाईची मागणी, पोलिस फौजफाटा गावात दाखल :- डॉ.गणेश ढवळे

चौसाळा ।प्रतिनिधी

बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर पेव फुटले असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आज दि.८ गुरुवार रोजी कानडीघाट येथील शेतकरी आक्रमक झाले असुन त्यांनी टॉवरची तार ओढण्याचे काम बंद पाडले असून अगोदर आम्हाला आमच्या शेतातील टॉवर उभारणी कामाचा तसेच उभ्या पिकातुन तार ओढणीचे काम केल्यास पिकांचे नुकसान होणार असुन अगोदर भरपाई द्या त्यानंतरच तार ओढण्याचे काम करा अशी भूमिका घेतली .पवनचक्की कंपन्यांनी अरेरावीची भाषा करत सुरूवातीला दंडेलशाही पद्धतीने काम रेटण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी आणखीनच आक्रमक झाले. पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस पाऊस फाटा जमा झाला होता त्यामुळे गावामध्ये काहीकाळ तणावाचे वातावरण होते. अखेर पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी काम न करताच निघून गेले.



गोलंग्री,कानडीघाट,सुलतानपुर या गावांमध्ये ओ २ कंपन्यांचे टॉवर उभारणे आणि तार ओढण्याचे काम सुरू असून शासकीय परीपत्रकाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी ३५ मीटर रूंदीचा नियम असताना जुने शासकीय परीपत्रके दाखवून १६ मीटर प्रमाणे नुकसान भरपाई घ्या म्हणतात तसेच याठिकाणी उभारलेल्या २६ टावर उभारण्यात आले असुन प्रत्येकाला नुकसान भरपाईचा मोबदला वेगवेगळा दिलेला आहे. गंभीर बाब म्हणजे या शेतकऱ्यांकडे करारनाम्याची प्रत नाही दिशाभूल करून सह्या घेतलेल्या आहेत.मे मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टावरचे काम झाले आहे त्यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही. एकंदरीतच शेतक-यांच्या अज्ञानाचा गैरफायदा कंपन्यांचे अधिकारी घेत असुन पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी न उभे राहता कंपन्यांच्या बाजुने उभे रहाताना दिसत आहे. असे मत श्रीकांत कवडे यांनी व्यक्त केले.

ओ २ कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी आमच्या उभ्या पीकातुन विद्युत तार ओढण्यासाठी आलेले असुन उन्हाळ्यात टावर उभारणीचे काम पूर्ण झालेले असताना तेव्हा तार ओढण्याचे काम न करता सध्या आमच्या उभ्या पिकातुन तार ओढण्यासाठी आलेले असुन आमच्या पिकांची नुकसान भरपाई द्यावी किंवा पिक काढल्यावर तार ओढण्याचे काम करण्यात यावे अशी आमची मागणी असुन कंपन्यांचे अधिकारी पोलिस फौजफाटा बोलावून दमबाजी करत तार ओढण्याचा प्रयत्न करत असुन आम्ही ग्रामस्थांनी तो हाणुन पाडला असुन आम्हाला नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय काम करू न देण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. असे विठ्ठल झोडगे यांनी सांगितले.

कानडीघाट येथील शेतकरी सुभाष रामभाऊ झोडगे यांना ६ लाख रूपयांचा धनादेश दि.१० जुन २०२४ रोजी दिला होता. सुभाष यांचे वडील रामभाऊ यांना बार्शी येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन उपचारासाठी पैसे काढण्यासाठी धनादेश बँकेत जमा केला असता खात्यावर पैसे नसल्याने वटला नाही.यापुर्वीही दोन वेळा अशा घटना घडलेल्या आहेत.त्यामुळे कंपनीच्या आर्थिक व्यवहार विषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.व्यवहार संशयास्पद असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत.

बालाघाटावर सध्या पवनचक्की प्रकल्प उभरणा-या कंपन्यांचे पेव फुटले असुन परराज्यातील कंपन्या स्थानिक दलालांना हाताशी धरून अशिक्षित शेतकऱ्यांना लालुच दाखवून त्यांची दिशाभूल करून जमिनी ताब्यात घेत असुन पोलिस प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करत दमदाटी करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच राजकीय लोकांचे कार्यकर्ते यांच्या मार्फत दबाव तंत्राचा वापर जमिनी बळकावण्यासाठी करत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे. राजकीय शक्तींचा वापर करून शेतकऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतक-यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी आर्थिक लाभापोटी कंपन्यांची पाठराखण करताना दिसुन येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

# मुकुंदराज वनपर्यटनासाठी दीड कोटींचा निधी उपलब्ध

## आ. नमिता मुंदडांच्या माध्यमातून पर्यटन आणि रोजगाराला मिळणार चालना

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**निसर्गाने मुक्तहस्ते वरदान दिलेल्या मुकुंदराज स्वामी समाधी परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करण्यासाठी राज्य शासनाने १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. वनसंपदेचे भांडार असलेल्या या भागाचा विकास करण्याच्या हेतूने आ. नमिता मुंदडा यांनी शासनाकडे वारंवार केलेल्या मागणीला यानिमित्ताने यश मिळाले आहे. अंबाजोगाई लगतच्या डोंगर रांगात मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराज यांची समाधी आहे.**

डोंगर-दऱ्या असलेल्या या परिसरात निसर्गाने मुक्तहस्ते



सृष्टिसौंदर्याची उधळण केलेली आहे. अमाप वनसंपदा आणि नैसर्गिक सौंदर्य लाभलेला हा परिसर निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीकोनातून वंचित राहिला. या परिसराचा विकास व्हावा आणि पर्यटनाच्या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळावा या हेतूने केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी मुकुंदराज वनपर्यटनासाठी वनविभागाकडे ६ कोटी ३८ लाख रुपयांचा प्रस्ताव दिला होता. यापैकी २ कोटी ७८ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर मंजूर पैकी १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे मुकुंदराज स्वामी निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासाला चालना मिळणार आहे. मूळ प्रस्तावातील त्रुटी दूर करून उर्वरित निधी देखील मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले आहे. दरम्यान, मुकुंदराज वनपर्यटन हा अंबानगरीच्या विकासात मैलाचा दगड ठरणार असल्याने यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री सुधीर मुनगुंटीवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ.प्रितमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा आभार मानले आहेत.

# शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महेश (कडा) सहकारी कारखाना लवकरच सुरू करणार- राम खाडे

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी मतदार संघातील शेतकऱ्यांची कामधेनु असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखाना २०११ पासून राजकीय पूढारी तथा माजी आमदाराच्या उदासीनतेमुळे बंद आहे. कारखाना बंद असल्यामुळे आष्टी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर दुसऱ्या ठिकाणच्या कारखान्यावर दुजाभाव केला जातो. कडा कारखाना हा शेतकरी, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद यांच्यासाठी हा जिव्हाळ्याचा विषय आहे. कारखाना बंद असल्याने मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकरी मागील अनेक वर्षापासून अडचणीत सापडलेला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली महेश (कडा) सहकारी साखर कारखाना लवकरच सुरू करणार असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी गुरूवार दि. ८ ऑगस्ट रोजी कडा कारखाना येथे उपोषणा दरम्यान केले. कडा कारखाना सुरू करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी कारखान्या समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या उपोषणात एडवोकेट एन एल जाधव, कामगार युनियनचे अध्यक्ष नवनाथ साबळे, गंगाधर आबा आजबे, कॉम्रेड महादेवराव नागरगोजे, भाई विष्णुपंत घोलप, नवनाथराव आटोळे, कामगार संघटनेचे बाजीराव थोरात, रावसाहेब जाधव, माजी सरपंच राहुल काकडे, बाळासाहेब मिसाळ, पंचायत समिती सदस्य दादासाहेब झांजे, दिनकरराव खिळे, राजेश कराड, शैलेश थोरवे, अहमद पठाण, अशोक पोकळे, बाबा म्हस्के, अशोक मस्के, तात्यासाहेब जेवे, परमेश्वर नागरगोजे, दादा निंबाळकर, किसन जाधव, शेख गणीभाई तांबोळी, माऊली आस्वर यांच्यासह तालुक्यातील शेतकरी, कामगार, विविध संघटनेचे नेते आदी या उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आपल्या भाषणात राम खाडे पुढे म्हणाले की, कधी आसमानी कधी दुष्काळी अशा अनेक संकटाचा सामना करीत असलेला शेतकरी कारखाना सुरू झाला तर त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही. आष्टी मतदार संघाचे माजी आमदार यांना कारखाना चालू होऊ द्यायचा नाही. कारखान्याचा प्रश्न सतत झुलवत ठेवायचा, कामगाराला थकीत वेतन मिळू द्यायचे नाही, कारखाना चालू करण्यासाठी कोणी आंदोलन करत असेल तर त्याला आंदोलन करू द्यायचे नाही असे अनेक प्रकार माजी आमदारांकडून आष्टी तालुक्यात सुरू आहेत. यामुळे मतदार संघातील सर्व सामान्य शेतकरी, ऊस उत्पादक शेतकऱ्यावर जाणून बुजून अन्याय करण्याचे काम माजी आमदाराकडून सुरू आहेत. सदरील कारखाना सुरू झाला तर मतदार संघातील अनेक गोरगरीब कामगारांचे उध्वस्त झालेले संसार पुन्हा फुलतील. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांची भेट घेऊन लवकरच महेश (कडा) सहकारी साखर कारखाना सुरू करणार असल्याचे प्रतिपादन राम खाडे यांनी यावेळी केले.



यावेळी विष्णुपंत घोलप आपल्या भाषणात म्हणाले की, कारखान्याच्या प्रश्नावर मी पक्षाचा जबाबदार म्हणून आपल्या सोबत राहील. कारण संघर्षाशिवाय काहीच मिळणार नाही. आष्टी विधानसभेतील लोकप्रतिनिधी बेजबाबदार आहेत. तज्ञांच्या सहकार्याने कारखाना सुरू करण्यासाठी ताकदीने काम करू असे सांगितले. यावेळी नवनाथ आटोळे यांनी कामगारांच्या पाठीमागे खाडे साहेब तुम्ही उभे आहात, शिवसेना (उ बा ठा) कायम कारखान्याच्या प्रश्नावर आपल्या बरोबर राहील असे प्रतिपादन नवनाथ आटोळे यांनी यावेळी केले. तर कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, या कारखान्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान फार मोठे आहे. कारखाना सुरू करण्यासाठी आपल्याला खूप मोठे आंदोलन करावे लागणार आहे. शेतकरी व कामगारांची चळवळ उभी करावी लागणार असल्याचे मत कॉ. नागरगोजे यांनी केले. या आंदोलनाला आष्टी तालुक्यातील कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, विविध संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT